शुक्रवार, दि. १८ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २५४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## २०२५ वक्फ विधेयकाच्या विरोधात बहुजन समाज एकत्र!

### १ मे रोजी जागृती जनसभा होणार

**जालना । प्रतिनिधी -** २०२५ वक्फ विधेयकाच्या विरोधासाठी संपूर्ण बहुजन समाजाने एकत्र येत आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर जालना येथील जुना जालना येथील जमात-ए-हिंद कार्यालयात आज राष्ट्रीय समन्वय समितीच्या पुढाकाराने बैठक पार पडली. या बैठकीत २०२५ वक्फ विधेयकाविरोधात जिल्हास्तरावर आंदोलन उभारण्याचा ठराव करण्यात आला.

बैठकीत ठरवण्यात आले की, दि. १ मे रोजी सर्व बहुजन समाज संघटना आणि सर्व विरोधी राजकीय पक्षांच्या सहभागातून एक भव्य जागृती जनसभा जालना जिल्ह्यात आयोजित करण्यात येईल. या सभेत वक्फ विधेयकाचे धोके आणि त्याचा बहुजन समाजावर होणारा परिणाम जनतेसमोर मांडण्यात येणार आहे.

या बैठकीस विविध राजकीय पक्षांचे आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून स. मुजीब सर यांनी २०२५ वक्फ विधेयक किती धोकादायक आहे, याचे सविस्तर विवेचन केले. त्यांनी सांगितले की, हे विधेयक केवळ जमिनींच्या मालकीहक्कावरच नाही, तर बहुजन समाजाच्या अस्तित्वावरच आळा घालणारे आहे.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमरे यांनी आपल्या भाषणात शासनाने बहुजन समाजावर लादलेले अन्यायकारक कायदे उघड करत अनेक उदाहरणे मांडली. राष्ट्रवादीचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश खंडळे, ओबीसी नेते बाबासाहेब वानखेडे, पाष्टर भाकरेजी, काँग्रेसचे अतिक खान, बसपाचे प्रमोद खरात, प्रकाशा बोडले, आकाश वाघमारे, नागसेन बनकर, डॉ. राधेश्याम जैस्वाल, संजय पाखरे, सदानंद टवले सर, बाबुराव साळवे, गौरव साळवे, शे. शकील नगरसेवक, मोईज, सूरज सोनवणे, अन्सारी, मुक्तार खान, फेरोज खान, इब्राहिम खान आणि इतर अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीची प्रस्तावना फेरोज अली यांनी सादर केली, तर सूत्रसंचालन इस्माईल सर यांनी केले.

आणि आभार प्रदर्शन तय्यब बापू देशमुख यांनी केला

हा कार्यक्रम बहुजन समाजाच्या एकतेचे प्रतीक ठरला असून, १ मे रोजी होणारी जनसभा ही विधेयकाविरोधातील लढ्याची नांदी ठरेल, असा विश्वास सहभागी नेत्यांनी व्यक्त केला आहे.या बैठकी चे आयोजक फेरोज अली, व समाजवादी पार्टी जालना जिल्हा अध्यक्ष शेख नबी सिपोराकर, व तसेस समाजवादी पार्टी चे मराठवाडा सदस्य प्रभाकर दांधागे, लतिफ भाई NCP, सं फुरकान सय्यद हरिस, मिर्झा शाहिद व इतर प्रमुख नागरिकांची आवर्जून उपस्थिती होती.




## जालन्यात पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया

**जालना । प्रतिनिधी -** शहरात पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया गेलंय. शहरातील निलम टॉकीजजवळ शहराला पाणीपुरवठा करणारी पाईपलाई फुटल्यानं रस्त्यावर पाणीच पाणी झाल्याचं बघायला मिळालं. शहराला जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा केला जातो. सध्या जालना शहरासह जिल्हा हा दुष्काळाच्या छायेत आहे. शहराला आधीच पंधरा दिवसांआड पाणीपुरवठा केला जातो. त्यात आता ही पाईपलाईन फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेलंय. त्यामुळं दुष्काळात तेरावा महिना असच म्हणावं लागेल. दरम्यान पाईपलाईन दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी दिली आहे. उन्हाळ्याच्या कडक तापमानात पाण्यासाठी नागरिक त्रस्त असताना, जालना शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शहरातील स्टेशन रोडवर निलम टाकीज जवळ पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी रस्त्यांवर वाहत आसल्याचे नागरिकांना पाहायला मिळाले. अनेक तास सुरू असलेल्या या पाण्यामुळे रस्त्यांवर भर उन्हात जिकडे तिकडे चोहिकडे पाणीच पाणी साचल्याचे दिसून आले.



पालिकेच्या गलथानपणावर शहरवासियांच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, पाण्यासारख्या मौल्यवान संसाधनाची भर ऊन्हाळ्यात अशी उधळपट्टी थांबवावी, अशी मागणी होत आहे.दरवर्षी उन्हाळ्यात जालना शहरात पाण्याची टंचाई निर्माण होत आहे.शहरात नागरिकांना दर आठ-दहा दिवसआड पाणी मिळते. अनेक घरात जारचे पाणी विकत घ्यावे लागते. अशा परिस्थितीत महानगरपालिकेचा गलथानपणाचा हा प्रकार पाणीटंचाईच्या संकटात भर टाकणारा ठरत असून शहरवासियांच्या जखमेवर मिठ चोळण्यासारखा आहे. पाणीपुरवठा विभागाच्या चूकीच्या व्यवस्थापनामुळे शहरात वारंवार पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन कुठे ना कुठे नेहमी फुटत असल्याचे नागरीकांनी बोलून दाखवले.अशा समस्यांवर प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना होणे गरजेचे असल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे.

## जिल्ह्यातील टंचाईग्रस्त १५८ गावात पाणी उपसा करण्यास बंदी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र भूजल पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनिमय अधिनियम-२००९ अन्वये वरिष्ठ भूवैज्ञानिकांनी जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई भासणाऱ्या गावांचा अहवाल सादर केला असून त्यात जिल्ह्यातील एकुण १५८ गावे टंचाईग्रस्त दर्शविली आहेत. तरी जालना जिल्ह्यातील टंचाईग्रस्त १५८ गावात ३० जुन २०२५ पर्यंत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उदभवावर प्रतिकुल परिणाम करणाऱ्या विहिरीमधील पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

जिल्ह्यातील जालना तालुक्यातील ४०, जाफ्राबाद तालुक्यातील २६, भोकरदन तालुक्यातील ५४, बदनापूर तालुक्यातील १४ आणि अंबड तालुक्यातील २४ असे एकुण १५८ गावांचा टंचाई भासणाऱ्या गावात समावेश करण्यात आलेला आहे. आदेशाचा भंग केल्यास महाराष्ट्र भूजल अधिनियम-२००९ मधील तरतुदीनूसार योग्य ती दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार वापरण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी व संबंधित तहसीलदारांना आदेशाद्वारे प्राधिकृत करण्यात आले आहे. तरी टंचाईग्रस्त गावात भूजल अधिनियम-२००९ नुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न करणे तलाठ्याला भोवले

### नियुक्ती आदेश रद्द; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**जालना । प्रतिनिधी -** अनुसूचित जमाती प्रवर्गातून तलाठी भरतीमध्ये नोकरीवर रुजू झाल्यानंतर सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र साधन सादर करणे बंधनकारक आहे. मात्र असे न करणाऱ्या एका तलाठ्याला जिल्हाधिकारी डॉक्टर श्रीकृष्ण पांचाळ यांनी तलाठी वैजनाथ साहेबराव रुद्रे यांचे नियुक्ती आदेश रद्द करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, सन २०२३ मध्ये निघालेल्या तलाठी भरतीमध्ये जालना जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत भरलेल्या पदामध्ये वैजनाथ साहेबराव रुद्रे यांची तलाठी पदी नियुक्ती करण्यात आली होती. अनुसूचित जमाती प्रवर्गातून त्यांची नियुक्ती असल्याने त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक होते. मात्र सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असताना देखील त्यांनी ते सादर केले नव्हते. शिवाय त्यांचे जात प्रमाणपत्र (कोळी महादेव) खोटे असल्याचा आक्षेप आम आदमी पक्षाचे तालुका अध्यक्ष सुभाष बोर्डे यांनी नोंदवत या प्रकरणात त्यांना नोकरीतून बडतर्फ करण्याची मागणी केली होती. या प्रकरणात वेळोवेळी वैजनाथ रुद्रे यांना प्रशासनाने नोटीस देखील बजावल्या होत्या. त्यानंतर त्यांनी जानेवारी २०२५ मध्ये जात वैधता प्रमाणपत्र तपासणीसाठी अर्ज केला होता. मात्र नियुक्ती वेळी दिलेल्या अटी शर्तींचे पालन न झाल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकारी डॉक्टर श्रीकृष्ण पांचाळ यांनी तलाठी वैजनाथ साहेबराव रुद्रे यांचे तलाठी पदाचे नियुक्ती आदेश रद्द करण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले आहेत.

## युवा आदर्श

### ईश संवेदना ...

सुळावर येशू ख्रिस्त
कशी साहिली वेदना
रोमन राक्षसी प्रवृत्ती
बोथट अति संवेदना
माफ करी मारेकऱ्यां
ईसाई करतो कामना
प्रत्येक मृत्यूशी युध्द
आत्मा जिंके सामना
रक्ताचे पाट वाहताना
त्यांची शांतते प्रार्थना
सदाचारी गुणावाचून
जगण्यास या अर्थ ना
मागतो सारे जगास्तव
मना कुठला स्वार्थ ना
आला शुभ ईस्टर संडे
बलिदान ते व्यर्थ ना
कु कृत्याचा पश्चात्ताप
मागायची रे क्षमापना
पुन्हा ना घडो पातके
तेधवा पूर्ण संकल्पना
मेणबत्त्या उजळताना
जाणा प्रकाश भावना
बायबल आचरण करे
दु:खाची नुरे संभावना

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## महापालिकेने खरेदी केलेल्या नवीन ट्रॅक्टरच्या साहित्याची चोरी

### महापालिका अधिकाऱ्यांची सीबीआय चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना महापालिकेने खरेदी केलेल्या नवीन ट्रॅक्टरच्या साहित्याची चोरी झाली आहे.महापालिकेने ४ ते ५ ट्रॅक्टर खरेदी केले आहेत. हे ट्रॅक्टर पालिकेच्या आवारात उभे असतानाच साहित्याची चोरी झाली.मात्र ही चोरी होताना महापालिकेला दिसली नाही का असा सवाल उपस्थित होत आहे.या चोरी प्रकरणी कुणीही पोलिसांत तक्रार दिलेली नाही त्यामुळे महापालिका अधिकाऱ्यांची सीबीआय चौकशीची मागणी करण्यात आली आहे.साद बिन मुबारक यांनी ही मागणी केली आहे.जिल्हाधिकारी आणि आयुक्तांना निवेदन देऊन ही मागणी करण्यात आली आहे.शहरात महापालिकेच्या घंटा गाड्या देखील आहेत. त्या गाड्यांची देखील साहित्य चोरीची घटना समोर आली आहे. खरेदी करण्यात आलेले ट्रॅक्टर पालिकेच्या आवारातच उभे असून किरायाने घेतलेल्या ट्रॅक्टरच्या माध्यमातून सध्या कामे सुरू आहेत. नवीन ट्रॅक्टरच्या सामानाची चोरी होऊनही अजून गुन्हा का दाखल करण्यात आला नाही असा सवाल देखील निवेदनाच्या माध्यमातून समाजसेवक साद बिन मुबारक यांनी उपस्थित केला आहे.

जालना महानगर पालिकेच्या मालकीचे स्वतःचे ट्रॅक्टर असताना पालिकेने खंडीभर ट्रक्टर बाहेरचे भाड्याने लावलेले आहे. पालिकेचे ट्रक्टर धूळ खात पडून ठेवायचे आणि बाहेरचे ट्रक्टर लावून वारेमाप पैसा खर्च करायचा हा काय प्रकार असल्याचे जनतेमध्ये प्रश्न निर्माण होत आहे. घंटा गाड्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाला असून देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांची बोगस बिले उचलली जात असल्याचा आरोप साद बिन मुबारक यांनी केला आहे.



## आयुष मंत्रालय केंद्रीय आयुर्वेदिक संस्था तर्फे धारावीत आरोग्य शिबिर संपन्न!



**मुंबई । प्रतिनिधी -** ४०वर्षावरील महिलांकरिता स्वास्थ परीक्षण,रक्तातील हिमोग्लोबिन, साखरेचे प्रमाण, रक्तदाब, हाडांचा ठिसूळपणा,संधिवात पांडू रोग यासारख्या आजारांवर आयुष मंत्रालय केंद्रीय आयुर्वेदिक संस्था तर्फे १७ रोजी सकाळी दहा ते दोन या वेळेत शास्त्रीनगर, धारावी येथे एका खास शिबिराच्या आयोजन व मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

स्थानिक सामाजिक कार्यकर्ते संजय टिके, श्रीकांत तावरे,किरण आगवणे,प्रशांत खाडे,दिलीप गाडेकर, महेश कवडे,बाबा घाडीगावकर यांनी पुढाकार घेऊन आयुष मंत्रालयाद्वारे या शिबिराचे आयोजन केले. मोफत तपासणी शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टर मनोहर गुंडेती व डॉक्टर दत्तात्रय दिघे यांनी महिलांची तपासणी करून योग्य ती औषधे व सल्ला दिला. या कामी पोद्दार महाविद्यालय प्रशिक्षण डॉक्टर टीम राजेश सांगडे,कोमल पवार, चंद्रशेखर पाटील,मानसी वसईकर,नम्रता भोसतेकर, विदुला यां टीमचेही सहकार्य लाभले. या शिबिरामध्ये ८0महिलांनी लाभ घेतला.लवकरच धारावी मध्ये स्त्री पुरुषांसाठी वेगळा विशेष आरोग्य शिबिर कार्यक्रमाचे आयुष मंत्रालय केंद्रीय आयुर्वेदिक संस्था तर्फे आयोजन करण्यात येण्यार असल्याची माहिती डॉक्टर मनोहर गुंडेती व डॉक्टर दत्तात्रय दिघे यांनी दिली.

## दोन उपविभागीय अधिकाऱ्यांसह ४ तहसीलदारांना निलंबित करा, अन्यथा आंदोलन करू; रयत क्रांती संघटनेचा ईशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात अतिवृष्टी अनुदान वाटपात झालेल्या ५० कोटींच्या घोटाळया प्रकरणी अंबड आणि भोकरदन येथील उपविभागीय अधिकारी यांच्यासह अंबड,घनसावंगी, भोकरदन,जाफराबाद या चारही तालुक्यातील तहसीलदारांनी शेतकऱ्यांचे ५० कोटी रुपये लूटले त्यामुळे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा युवक अध्यक्ष गजानन राजबिंडे पाटील यांनी आज दि.१७ गुरुवार रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,यांच्याकडे केली आहे.या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नुकसान भरपाईची संयुक्त पाहणी केलीच नाही ही अत्यंत बाब निंदणीय आहे. बीड अहिल्यानगर आणि बुलढाणा जिल्ह्यातील बोगस शेतकरी दाखवून जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे अनुदानाची रक्कम लाटली त्यामुळे संबंधीतावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी रयत क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये संबंधीत अधिकारी जबाबदार असतील तर ते सर्व पुरावे मिटविण्यासाठी प्रयत्न करतील त्यामुळेच संबंधीत तात्काळ निलंबीत करण्यात यावे अशीही मागणी करण्यात आली आहे.

तसेच सन २०२२-२३ या वर्षी झालेली अतिवृष्ट पुर आणि गारपीटमुळे जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले होते हे अनुदान शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित असतांना उपविभागीय अधिकारी अंबड,भोकरदन, तसेच तहसीलदार अबंड, घनसावंगी,



भोकरदन, जाफराबाद, तसेच संबंधीत तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, यांनी खऱ्या लाभार्थींना लाभ न देता बोगस शेतकरी दाखवून त्या शेतकऱ्यांच्या नावे अनुदानाची कोट्यावधी रुपयांचा रक्कम हडप केल्याची प्राथमिक माहिती समोर आलेली आहे.

तसेच संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी आणि संबंधीत चारही तहसीलदार यांना तात्काळ निलंबीत करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशीही मागणी करण्यात आली आहे. नसता लोकशाही मार्गाने रयत क्रांती संघटनेच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्यात येईल याची नोंद घ्यावी त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील.असा ईशारा रयत क्रांती संघटनेने दिला आहे.

दिलेल्या निवेदनावर रयत क्रांती संघटना युवक मराठवाडा अध्यक्ष गजानन राजबिंडे, जिल्हा कार्याध्यक्ष रवि ईंचे, जिल्हा सचिव दीपक बोबडे, राहुल बोबडे, नामदेव मंडपे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संपादकीय

# सोशल मीडियावरही आयपीएलचा फिव्हर !

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे अठरावं वर्ष आहे. सलग अठरा वर्ष आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्ष केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माप्रमाणे स्थान असलेल्या भारतामध्ये आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी फॅन मैदानावर गर्दी करताना दिसतात. आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे. सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र ट्विटर ( एक्स ) अकाउंटस आहेत. प्रत्येक संघाला ट्विटरवर ( एक्स ) फॉलो करणारे लाखो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स ट्विटर वरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स चा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट करत असतात. या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्स आणि रॉयल बंगळुरू चॅलेंज या संघांचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर प्रमाणेच व्हाट्सएप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात. आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व रॉयल चेलेंजर्स बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विराट कोहली याला मिळत आहे. टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराट कोहलीची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरुन लक्षात येते. दूरचित्रवाणीवर तर प्रेक्षक सामने पाहतच असतात पण ज्यांना दूरचित्रवाणीवर सामना पाहणे शक्य होत नाही ते मोबाईलवर सामना पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा सामना कोणत्याही संघासोबत असला तरी प्रेक्षक त्यांचा सामना आवर्जून पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना जिओ टीव्ही वर सर्वात जास्त पाहिला जातो. करोडो प्रेक्षक जिओ टीव्हीवर सामने पाहतात. प्रत्येक सामन्याला करोडो प्रेक्षक मिळतात हा एक विश्वविक्रमच आहे. फेसबुक, व्हाट्सएपवर मॅच कोण जिंकणार याबद्दल चाहत्यांमध्ये पैजा लागत आहे. मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. गुजरात टायटन संघाचा मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरा खेळाडूंना सतत काही ना काही सल्ले देत असतो. ड्रिंक्स ब्रेक मध्ये तर तो कर्णधार आणि खेळाडूंना सल्ला देत असतोच पण सामना चालू असतानाही तो खेळाडूंचे डोके खात असतो. वेडावाकडा चेहरा करून हातवारे करत तो खेळाडूंचे डोके खात असतो त्यामुळे त्याची खिल्ली उडवणारे अनेक मिम्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. चेन्नई आणि मुंबई संघ सध्या पराभवाच्या गर्तेत सापडले आहेत. सलग पाच सामन्यात पराभव झाल्याने चेन्नई संघ नेटिझन्सच्या निशाण्यावर आला असून या संघाची सोशल मीडियावर चांगलीच खेचली जात आहे. तीच गत मुंबईची आहे. मुंबईचाही सलग चार सामन्यात पराभव झाला आहे. त्यामुळे या दोन्ही संघांना सोशल मीडियावर टार्गेट केले जात आहे. या दोन्ही संघाचे आधारस्तंभ असलेले धोनी आणि रोहित शर्मा हे देखील आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करत नसल्याने त्यांची देखील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात खिल्ली उडवली जात आहे. प्रतिस्पर्धी संघाची आणि संघातील खेळाडूंची मजेशीर मिम्स आणि बनवून आणि मेसेज करून खिल्ली उडवतानाच नेटकरी आपल्या आवडत्या संघाला मात्र भरघोस पाठिंबा देत आहेत. आपल्या आवडत्या संघाला भरघोस पाठिंबा देतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून फॅन आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसून येत आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# शिकाऊ उमेदवारीसाठी भरती मेळावा

**जालना । प्रतिनिधी -** मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्राकडून जालना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पंतप्रधान राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन दि.२१ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आला आहे. भरती मेळाव्यात जालना, छत्रपती संभाजीनगर व पुणे येथील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. मेळाव्यात सहभागी होतेवेळी उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका, आधारकार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट फोटो सोबत बाळगावा. सर्व व्यवसायातील उमेदवारांनी शिकाऊ उमेदवारीसाठीच्या आयोजित भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्राच्या सहप्रशिक्षणार्थी सल्लागार तथा प्राचार्य आर.एस.शेळके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# अविस्मरणीय १० एप्रिल !

आम्हा सर्व सख्यांसाठी १० एप्रिल २०२५ हा दिवस आमचा आनंद द्विगुणित करणारा, अविस्मरणीय असा ठरला. सांगते, ते का म्हणून !

पहिले म्हणजे भिशी निमित्त गणरायांचे दर्शन होणार होते. तर दुसरे म्हणजे आमच्या सहलीची आयोजक नि व्यवस्थापक, आम्हा सर्वांची प्रिय सखी सौ. अलका भुजबळ हिची त्याच दिवशी दूरदर्शनच्या सह्याद्री चॅनलवर हॅलो सखी कार्यक्रमात थेट मुलाखत प्रसारित होणार होती. दोन्ही गोष्टींचा ताळमेळ कसा साधला जाईल, या विषयी आम्ही सख्या खरं तर चिंताच करीत होतो. पण अलका वर पूर्ण विश्वास असल्याने सर्व काही ठरल्या प्रमाणे होईल, असेही निश्चित वाटत होते आणि खरंच सर्व काही ठरविल्याप्रमाणे अलकाने सहलीचे नियोजन यशस्वीपणे केले.

सहलीला निघण्यापूर्वी आम्ही दुपारी बारा ते एक वाजेपर्यंत, अलकाची मुलाखत ऐकली व पाहिली. सह्याद्रीवर वाहिनीवर हॅलो सखी या कार्यक्रमात, बहुआयामी सखी या विषयावर प्रसारित झालेली तिची ही मुलाखत खूपच प्रेरणादायी होती. जाता - जाता खास स्त्रियांना तिने दिलेला मंत्र, स्वतःचे आरोग्य जपा, आत्मविश्वासाने जगा आणि स्वतः साठी जगा. हा तर प्रत्येक महिलेने, मुलीने आचरणात आणला पाहिजे, असाच आहे.

आज आम्ही सर्व जणी एमटीएनएल मधून व्हीआरएस घेतल्यापासून स्वच्छंदी - मनमौजी जीवन जगत आहोत. हे दृश्य फक्त नवी मुंबईत प्रकर्षाने जाणवत आहे. याचे कारण म्हणजे जगण्याचा मंत्र देणारी नि अंमलात आणणारी अलका भुजबळ होय.

वाशीहून दुपारी अडीज वाजता पस्तीस जणीं साठी शिवनेरी बस निघाली. सानपाडा मार्गे प्रत्येक ग्रुप ला ठरलेल्या जागी घेत पनवेल पर्यंत, साऱ्यांना बसमध्ये घेऊन आम्ही ३५ जणी उरण जवळील चिरनेर येथे महागणपती चे दर्शनाला निघालो. तसा प्रवास लांबचा नव्हता. चार वाजता आम्ही चिरनेरला येऊन पोहोचलो.



मंदिराबाहेरील प्रशस्त मोकळे पटांगण, नि भाविकांना दर्शनानंतर बसण्यासाठी भव्य असा मंडप ! बसण्यासाठी काही स्टीलच्या बाकांची सोय होती, तर जमिनीवर सतरंज्या टाकून बसण्याचीही सोय केली होती.

नंदीच्या पाठीवर हात फिरवत, वंदन करून रांगेत मंदिराच्या गाभाऱ्यात गेलो. लाल शेंदुराने रंगवलेली महागणपतीची मोठी मूर्ती, चमकणारे दिव्य ते नयन, पाहताच क्षणी बाप्पाच्या भक्तीत बुडावे, आम्ही सर्वजणींनी बाप्पाची मनोभावे आरती केली आणि सोबत आणलेला नैवेद्य बाप्पासमोर ठेवला. पेशवेकालीन महागणपती अतिशय मोहक मूर्ती डोळ्यात साठवून ठेवावी अशी.

उरणचा महागणपती

समोर बसल्यानंतर तेथील पुजारी नितीन पाटील व न्यूज स्टोरी टुडे या वेब पोर्टलचे नियमित लेखक, वाचक श्री अनिल घरत यांची ओळख अलकाने करून दिली. त्यांनी या गणपतीची थोडक्यात माहिती दिली. ब्रिटिशांनी जंगलांवर हल्ला करून, नैसर्गिक संपत्तीची लूट करण्यास सुरुवात केली तेव्हा येथील पूर्वजांनी, त्यांना कसा विरोध केला, त्यावेळी काहीजण आपले प्राण गमावून अमर झाले. त्यांची साक्ष म्हणून ब्रिटिशांनी चालवलेली बंदुकीची गोळी ज्या ठिकाणी चाटून गेली, त्या जागी लाल रंगाची खूण दाखवून त्या संबंधीची माहिती दिली.

सर्वांचे दर्शन झाल्यावर आम्ही भक्त मंडपात भिशी फोडली. बाप्पा समोर भिशी ज्यांना लागली त्यांना अत्यंत आनंद झाला. जणू भिशी च्या रूपात बाप्पाने त्यांना प्रसाद दिला. तेथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे जिथे आम्ही बसलो असताना एक श्वान, अगदी गणपती समोर आमच्या शेजारी बसून होता. साऱ्यांचे निरीक्षण करत होता. हे जागृत देवस्थान आहे, त्यामुळे त्याची प्रचिती देत आहे असा भास झाला ! बाप्पांची आरती करून प्रसाद घेऊन, आम्ही आता केगाव च्या 'रिद्धी सिद्धी सिद्धिविनायक गणपती'ला निघालो.

एक-दीड तासाच्या प्रवासानंतर आम्ही सिद्धिविनायक गणपती केगाव येथे पोहोचलो. तेथील रस्ते अरुंद असल्याने आम्हाला बस अगदी मंदिराजवळ नेता नाही आली. त्यामुळे थोडे चालण्यास मोकळीक मिळाली, बरे वाटले. मुख्यद्वारातून आत येताच, पायावर पाणी घेऊन, आम्ही मंदिराकडे वळलो. समोरच प्रशस्त मंदिराचा परिसर, खूप छान दिसत होता. चहुबाजूनी सेवाभावी लोकांसाठी केलेली सोय, एका खोलीतून कीर्तन-भजनाचा आस्वाद घेता आला. पटांगणात वृंदावन नि सभोवती मोकळे पटांगण, खूपच सुंदर ! तिथे आमची बचतगटाच्या सेवानिवृत्त प्राध्यापक सौ. माधुरी कुलकर्णी आणि वर्षा अधिकारी यांची भेट झाली.

त्यांच्या मुखातून, 'गणपती नवसाचा आहे.' आणि एकाच दगडात गणपती आणि त्याच्या बाजूला रिद्धी सिद्धी अशी ही एकमेव प्राचीन मूर्ती आहे, त्यांचे अनुभव ऐकले. त्यांच्या सासऱ्यांपासून गणपतीची सेवा केली जात आहे. ती त्यांच्या सुनेकडून पुढे चालू राहिली आहे. त्यांनी बचतगटाची निर्मिती करून, तेथील महिलांना एक उपजीविकेचे साधन उपलब्ध करून दिले आहे. पेशवेकालीन हा सिद्धिविनायक त्यांच्या दोन्ही बाजूस रिद्धी-सिद्धीच्या मूर्ती पाहवयास मिळाल्या. दुसरे म्हणजे मंदिर उद्ध्वस्त होऊ नये म्हणून देवळावर कळसाऐवजी मशिदीचा आकार दिला आहे, गणपतीमूर्तीच्या मागे शिलालेख कोरला आहे. या गोष्टी उल्लेखनीय वाटल्या.

केगावचा सिद्धिविनायक

गणपतीचा प्रसाद उकडीचा मोदक ! खूपच अप्रतिम ! पाहुणचारात, बचत गटाच्या सौ वर्षा अधिकारी यांनी सर्वांना कांदेपोहे आणि त्यासोबत छान कैरीचे पन्हं, प्यायला दिले. तिथे जाणवलेली एक गोष्ट म्हणजे, एक वयस्कर स्त्री वांगी व चवळीच्या शेंगा पिशवीत घेऊन विकत होती. खूप जणांनी त्या विकतही घेतल्या. मंदिराच्या दारापर्यंत येऊन ती प्रेमाने घ्या असे सांगत होती, 'तुम्ही या आमच्या बरोबर खाऊन घ्या', असं म्हटलं तर म्हणाली 'नाही, तुम्ही प्या व खा. तुमचा हा पाहुणचार आहे. आम्ही रोजचेच आहोत. सेवेचा हा अनुभव गवसला. मंदिरातील संध्याकाळची आरती घेऊन सर्वांनी सिद्धिविनायकाचा प्रसाद घेतला व तिथून तेलपोळ्या, मोदक आणि काही जेवाणोपयोगी पदार्थ विकत घेऊन, आम्ही पुढच्या सफरीच्या वाटेवर निघालो.

अंधार झाला होता. रामबागची, उलवे येथे एक सफर बाकी होती. रामबाग उद्यानाची रात्रीची लायटिंग बघण्यासारखी असते, पण तेथे पोहोचेपर्यंत नऊ वाजून गेले होते. उद्यान बंद झाले होते त्यामुळे तिकडे गेलो नाही. पुढे वडाळे तलाव पनवेल येथे तलावाकाठी येऊन जेवण करावे, म्हणून तेथे थांबलो साधारण गर्दी होती. परंतु परिसर जेवण्यासाठी काही योग्य वाटला नाही, त्यामुळे जेवणाची पंगत गाडीतच बसून केली. केगाव येथून बचतगटाच्या वर्षा अधिकारी आणि माधुरी मॅडम ने दिलेले जेवण खूपच सात्विक होते. तिथून निघताना बराच उशीर झाला होता. येतानाचा मार्ग थोडा बदलला गेला. प्रत्येकीला शक्यतो घराजवळ सर्वांना सुखरूप उतरवण्याचे कार्य अलका पार पाडत होती.

सख्यांनो ! एकूण भिशी सोहळा खूप छान सजला. देवाच्या दारात भिशी ज्यांना लाभल्या, त्यांचे हार्दिक अभिनंदन-अभिनंदन-अभिनंदन ! पण मला जाणवलेली एक सुंदर कल्पना. सोळावं वरीस धोक्याचं असतं, तर साठावं वरीस स्वतःच असतं. तुम्हाला काय वाटतं ?

**- सौ वर्षा भाबल.**
**नवी मुंबई.**
**९८६९४८४८००**

# अत्याचारी इंग्रजांना चाप लावणारे चापेकर बंधू

(बलीदानदिन : दामोदर चापेकर - १८ एप्रिल १८९८, बाळकृष्ण चापेकर - १२ मे १८९९, वासुदेव चापेकर - ८ मे १८९९)

प्लेगच्या निमित्ताने पुण्यातील जनतेवर अत्याचार करणारा अधिकारी रँड याला दामोदरपंतांनी गोळ्या घातल्या. त्या वेळी आयर्स्ट या अधिकार्याला बाळकृष्णांनी गोळ्या घातल्या. या प्रकरणी फितुरी करणार्याला वासुदेवांनी संपवले. या चापेकर बंधूंना इंग्रजांनी फाशी दिले. या तीन सख्या भावांनी राष्ट्रकार्यासाठी बलीदान दिले.

क्रांतीकार्याची आवश्यकता म्हणून चापेकर बंधूंनी प्रतिदिन बाराशे सूर्य नमस्कार घालणे आणि एका तासात अकरा मैल पळण्याचाही वेग प्राप्त करणे

दामोदर हरि चापेकर यांचे घराणे मूळचे कोकणातील वेळणेश्वरचे; मात्र त्यांचे पूर्वज पुण्याजवळील चिंचवडला येऊन स्थायिक झाले. तेथेच २५.६.१८६९ या दिवशी दामोदरपंतांचा जन्म झाला. लहानपणापासूनच दामोदरपंत आणि त्यांचे दोन्ही बंधू बाळकृष्ण आणि वासुदेव यांचा ओढा हिंदुस्थानला परदास्यातून मुक्त करण्याकडे होता. क्रांतीकार्याची आवश्यकता म्हणून ते प्रतिदिन बाराशे सूर्यनमस्कार घालीत, तसेच एका तासात अकरा मैल पळण्याचाही वेग त्यांनी प्राप्त केला होता.

दामोदर आणि बाळकृष्ण यांनी राणी व्हिक्टोरियाच्या मुंबईतील पुतळ्याला डांबर फासून जोड्यांची माळ घालणे

दामोदरपंतांचे वडील हरिभाऊ यांचा प्रत्येक चातुर्मासात मुंबईला जाऊन प्रवचने करण्याचा प्रघात होता. १८९६ च्या चातुर्मासात वडिलांबरोबर साथीला गेलेल्या दामोदर आणि बाळकृष्ण यांनी तेथील राणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याला डांबर फासून जोड्यांची माळ घातली. या काळात काँग्रेसच्या अधिवेशनांचा प्रारंभ ब्रिटिशांच्या राणीच्या स्तवनाने होत असे, हे माहीत असलेल्यांना या धाडसी कृत्याचे मोल कळेल !

सन्नीपात (प्लेग) रोगाच्या निमित्ताने इंग्रज अधिकारी रँडने नागरिकांवर अत्याचार करणे

१८९६ साली ग्रंथिक सन्नीपात (प्लेग) हा रोग पुण्यात झपाट्याने पसरू लागला. सरकारने या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी 'रँड' नावाच्या आय.सी.एस. अधिकार्याची नेमणूक केली. त्याचे गोरे सैनिक घरे तपासण्याच्या निमित्ताने नागरिकांवर अत्याचार करू लागले.

बाळकृष्णानी वासुदेवरावांची 'गोंद्या आलाऽ रे आला' ही परवलीची आरोळी ऐकून




आटोपल्यावर रँड आणि आयर्स्ट आपापल्या स्वतंत्र घोडागाड्यांतून निघाले. आयर्स्टची घोडागाडी पुढे होती. वासुदेवरावांची 'गोंद्या आलाऽ रे आला ' ही परवलीची आरोळी ऐकताच आणि रँडसारखी दिसणारी आयर्स्टची घोडागाडी दिसताच बाळकृष्ण चालत्या घोडागाडीत शिरले आणि त्यांनी त्यांचे 'रिव्हॉल्व्हर' आयर्स्टच्या मस्तकात रिकामे केले.

तरीही लांबून येणारी परवलीची आरोळी थांबत नाही, हे कळताच दामोदरपंत काय

आयर्स्टला आणि पुन्हा तीच परवलीची आरोळी ऐकू आल्याने दामोदरपंतांनी रँडला ठार मारणे

पुण्यातील हे अत्याचार चापेकर बंधूंच्या अंत:करणात प्रतीशोधाची आग पेटवत गेले. रँडचा सूड घेण्याची संधी चापेकरबंधूंना लवकरच मिळाली. १८९७ हे वर्ष राणी व्हिक्टोरियाच्या राज्यकारभाराचे ६० वे वर्ष होते. त्या निमित्ताने पुण्यातही गणेश खिंडीतील राजभवनावर एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. २२.६.१८९७ या रात्री गणेश खिंडीतील समारंभ ते समजले. बाळकृष्णपंतांनी हिरावून घेतलेली संधी परत मिळाल्याचा आनंदही त्यांना झाला. रँडच्या गाडीमागे धावणार्या वासुदेवरावांना थांबवून त्यांनी स्वतः गाडीवर उडी घेतली. छपरावरील पडदा बाजूला सारून त्यांनी पाठमोर्या रँडवर आपले रिव्हॉल्व्हर मोकळे केले. दामोदरपंत कार्यसिद्धीच्या आनंदात गाडीवरून खाली उतरले; पण दोन्ही घटना गाडीहाक्यांच्या ध्यानातच आल्या नाहीत.

द्रविड बंधूंच्या चुगलखोरीमुळे दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत यांना, तर चुगलखोर द्रविडबंधूंना ठार मारल्याने सुदेवपंतांना फाशीची शिक्षा होणे

काही महिन्यांनी द्रविड बंधूंच्या चुगलखोरीमुळे दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत यांना पकडण्यात आले. त्यांच्यावर अभियोग चालून १८.४.१८९८ या दिवशी दामोदरपंतांना आणि १२.५.१८९९ या दिवशी बाळकृष्णपंतांना फाशी देण्यात आले. चापेकर बंधूंची ही कहाणी एवढ्यावरच संपली नाही. द्रविड बंधूंच्या चुगलखोरीची माहिती कळताच धाकटे वासुदेवपंत संतप्त झाले. महादेव रानडे नावाच्या मित्राच्या साहाय्याने त्यांनी चुगलखोर द्रविडबंधूंना ठार मारले आणि ८.५.१८९९ या दिवशी ते स्वतः फासावर चढले

रँडच्या वधाच्या वेळी दामोदरपंतांचे वय होते २७ वर्षे, मधल्या बाळकृष्णपंतांचे वय होते २४ वर्षे आणि धाकट्या वासुदेवरावांचे वय होते १८ वर्षे ! या विशी-पंचवीशीतील तरुणांचा असीम त्याग आणि शौर्य पाहून आजही उर अभिमानाने भरून येतो ! तीन सख्या भावांनी राष्ट्रकार्यासाठी केलेले हे बलीदान जगात एकमेव आहे !

राष्ट्र आणि धर्म रक्षणासाठी प्रतिदिन बलोपासना करण्याचा चापेकर बंधूंचा आदर्श आपणही जोपासूया. चापेकर बंधूंना विनम्र अभिवादन !

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती,**
**संपर्क क्र.: ८२०८४४३४०१**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात महिलेचा आत्महत्तेचा प्रयत्न!

## पोलिसांनी पेट्रोल बॉटल केली जप्त; महिलेलाही दिली समज

**जालना । प्रतिनिधी** - जालन्याच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात शिपाई पदावर काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याचं १६ महिन्यांपूर्वी निधन झालं. पतीच्या



निधनानंतरही फॅमिली पेन्शन लागू होत नसल्यानं विधवा महिला १६ महिन्यापासून कार्यालयातील चक्र काढत आहे कार्यातील श्री.ए.एम. चव्हाण कार्यकारी अभियंता काम करून देण्यासाठी वारंवार टाळाटाळ करत असल्याने महिलेनं आत्म हत्या करण्यासाठी जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयात बॉटल भरून पेट्रोल आणलं. पण या विधवा महिलेनं आत्म हत्येचा प्रयत्न करण्याआधीच तैनात असलेल्या पोलिसांनी महिलेच्या हातातून पेट्रोलची बॉटल हिसकावून घेतली. त्याम ुळे पुढचा अनर्थ टळला. रत्नम ाला कऱ्हाळे असं या विधवा महिलेचं नाव आहे. दरम्यान, पोलिसांनी महिलेवर कोणतीही कारवाई न करता समज देऊन तिची सुटका केलीय. यावेळी रत्नमाला कऱ्हाळे यांच्यासोबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी चर्चा केली. यावेळी चर्चा सकारात्मक झाल्याने रत्नमाला कऱ्हाळे यांनी आत्महत्येचा विचार सोडला. यावेळी कदीम जालना पोलिसांच्या सतर्कतेम ुळे मोठा अनर्थ टळला आहे. त्यामुळे कदिम पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**चैत्र महिन्यात वाघ्रुळ जहागीर येथे आई भवानी सोंग काढण्यात आले होते. त्या नंतर नवरदेव नवरी भटजी चे सोंग काढण्यात आले होते. विविध सोंग काढण्याची रात्री नाटक बसवण्याची या गाव ची जुनी परंपरा आहे असे गावकरी सांगतात. गावकरी प्रत्येक कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.**

## डेप्युटी सीईओ यांची पाटोदा शाळेस भेट

**मंठा** - तालुक्यातील पाटोदा येथे १६ एप्रिल रोजी ग्राम दरबार घेण्यात आला. याप्रसंगी प्रशाला व प्राथमिक शाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात आली.ही तपासणी जिल्हा परिषदेचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा ग्राम दरबारचे कार्यक्रमाचे संपर्क अधिकारी एल.बी.बारगिरे यांनी केली. पहिलीच्या वर्गात भेट देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केले. वर्गशिक्षक गंगाधर वानोळे यांच्यासह, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, सरपंच प्रतिनिधी गणेशराव चव्हाळ, गट समन्वयक के.जी.राठोड उपस्थित होते.

# तपोवन गोंधन येथे महामानवाला अभिवादन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - जाफराबाद तालुक्यातील तपोवन गोंधन येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम येथील ग्राम पंचायत कार्यालयात महामानवाला अभिवादन करण्यात आले. यानंतर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत जयंती साजरी करण्यात आली. या दोन्ही ठिकाणी उत्सव समितीच्या वतीने बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. यावेळी आपल्या प्रास्ताविकात शिक्षक कैलास चेके यांनी बाबासाहेबांच्या साम्यवादी विचारात विश्वशांतीची बीजे पेरलेली असल्याचे सांगितले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष राजू हिवाळे, मुख्याध्यापक पृथ्वीराज तळेकर, शिक्षिका सुलभा गायकवाड आदींनी बाबासाहेबांच्या जीवन कार्यावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला सरपंच अंजना फलके, उत्सव समितीचे अध्यक्ष राजू हिवाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सिद्धार्थ हिवाळे, समाधान फलके, तंटामुक्त समिती अध्यक्ष शिवाजी फलके, विठ्ठल उगले, नसीम शेख, सुखदेव चेके यांच्यासह उत्सव समितीचे भीमराव हिवाळे, समाधान हिवाळे, नितीन हिवाळे, गौतम हिवाळे, आकाश हिवाळे, विजय हिवाळे, राहुल हिवाळे, सुधाकर हिवाळे, सचिन हिवाळे, कैलास हिवाळे, शरद हिवाळे, उमेश हिवाळे, योगेश हिवाळे, युवराज कांबळे, बाळू हिवाळे, रावसाहेब हिवाळे, आर्यन हिवाळे, मनोज हिवाळे,



पवन हिवाळे, बुद्धभूषण रगडे, कृष्णा हिवाळे, संदीप हिवाळे, राहुल हिवाळे, सोमनाथ बनसोडे, रोहित हिवाळे, सुरज हिवाळे, देविदास वाकोडे, रेवांश हिवाळे, कल्पेश हिवाळे, सम्यक हिवाळे आदींची उपस्थिती होती. फोटो -तपोवन गोंधन येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा व उत्सव समिती तर्फे बाबासाहेबांना अभिवादन करताना उत्सव समितीचे पदाधिकारी व शिक्षकवृंद.



## रघुवीर गुडे यांचा सन्मान



**जालना । प्रतिनिधी** - सामाजिक व राजकीय क्षेत्रातील युवा नेतृत्व रघुवीर गुडे यांनी आपल्या कामातून महाराष्ट्रात एक वेगळा ठसा उमटवला आहे आपल्या वक्तृत्वातून आणि सामाजिक कार्यातून त्यांनी समाजाच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे असे युवकाचे कणखर नेतृत्व रघुवीर गुडे यांनी बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठातून सर्वो त्तम गुणाने पदवी प्राप्त केल्याबद्दल राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात ऍड. प्रदीप कुलकर्णी, प्राचार्य सुनंदा तिडके प्रा.सत्संग म ुंढे, उपप्राचार्य डॉ.सोमीनाथ खाडे यांनी पदवीदान सम ारंभामध्ये पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेत्तेर कर्मचारी उपस्थित होते. आपल्या सामाजिक सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात रघुवीर गुडे यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांची ओळख जनसामान्याचा नेता अशी असून एक उच्च शिक्षण घेऊन केवळ समाजासाठी सातत्याने सेवेत असणारे असे तरुण देशाला नक्की पुढे घेऊन जातील असा विश्वास ऍड प्रदीप कुलकर्णी यांनी केला.

## शालेय पोषण आहाराचा तपशील आठ दिवसात द्या अन्यथा आमरण उपोषण- सविता कांबळे

**परतूर । प्रतिनिधी** - परतूर पंचायत समितीच्या अंतर्गत एकुण केंद्रातील सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक ५ वी ते ८ वी, माध्यमिक इयत्ता ५ वी ते १० वी, ह्या शाळांना सन २0२0, ते २0२५ या शैक्षणिक वर्षात जे शालेय पोषण आहार मिळाला आहे. तो कुठुन आणला आहे.त्याचे खरेदी किंवा टेंडर आसतील तर त्याचे रिपोर्ट देण्यात यावे.खरेदि काय दराने केली कोणाच्या मार्फत केली आहे याची सर्व तपशीलवार माहिती देण्यात यावी.पंचायत समेती त्यावर कसे नियम निर्धारित करते याची नियमावली घेतलेला माल जेकिही असेल कडधान्य,तेल,मिठ, वगैरे याची पण सवीस्तर माहिती आठवडा भराचे नियम तुम्हाला शासनाने ठरवून दिलेली आहेत.त्याची नक्कल, खरेदीची जी एस टी बीले,वाटप प्रक्रिया अहवाल याची सविस्तर माहिती आपल्या कार्यालया कडून मला तात्काळ मिळावी नसता परतूर पंचायत समितीच्या समोर आम रण उपोषण करण्याचा इशारा



सामाजिक कार्यकर्त्या सविता कांबळे यांनी दिला आहे.

## राज्य सेवा मुख्य परिक्षेच्या तारखा बदलल्या

महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं विद्यार्थ्यांच्या मागण्यांची दखल घेत राज्य सेवा मुख्य परीक्षा एक महिन्यानं पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल आहे. राज्य सेवा मुख्य परीक्षेच्या तारखा आयोगाकडून जाहीर करण्यात आल्या आहेत. आता राज्यसेवा मुख्य परीक्षा २७, २८ आणि २९ मे या तीन दिवसांच्या कालावधीत होईल. यापूर्वीच्या नियोजनाप्रमाणं परीक्षा २६ ते २८ एप्रिल या कालावधीमध्ये होणार होती. मात्र, काही विद्यार्थ्यांकडून आयोगाकडे तांत्रिक समस्या दूर करणे आणि मुदतवाढ देण्यासंदर्भात विनंती केली होती.

## परतूर येथे लॉयन्स क्लबच्यावतीने पाणपोई



**परतूर । प्रतिनिधी** - लायन्सच्या पाणपोई चे उद्धाटन मुंडे उप पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन परतुर यांच्या हस्ते दि.१७/0४/२०२५, रोजी करण्यात आले .

लायन्स क्लब परतुर व प्रबोधनकार ठाकरे नागरिक पतसंस्था यांच्या माध्यमातू पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे . लायन्स क्लब चे अध्यक्ष प्रमोद टेकाळे व संस्थापक अध्यक्ष मनोहर खालापुरे यांच्या सहकार्याने ही पाणपोई चालवण्यात येत आहे . यावेळी उपस्थित पत्रकार भारत सवने.डॉक्टर भानुदास कदम मधुकर भोसले अरुण शेपाळ बबनराव वनमुखे संजीवनी खालापुरे संतोष शिंदे शकुंतला भोसले डॉ संदीप चव्हाण संतोष दीक्षित मुकुंद शेपाळ कृष्णा गोरे सुमित कुदळे पवन ढवळे बबन झोरे उपस्थित होते.

## ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’च्या संकेतस्थळाचे गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते उदघाटन

**पणजी (गोवा) । प्रतिनिधी** - सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फर्मागुडी, फोंडा, गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या SanatanRashtra Shankhnad.in या इंग्रजी भाषेतील संकेतस्थळाचे उद्घाटन गोवा राज्याचे मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत यांच्या हस्ते पर्वरी, गोवा येथील मुख्यमंत्री कार्यालयात करण्यात आले.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी संकेतस्थळाचे अवलोकन केले, तसेच कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी या ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’च्या ‘स्वागत समि ती’तील पू. पृथ्वीराज हजारे, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे, तसेच श्री. नारायण नाडकर्णी, श्री. मधुसूदन कुलकर्णी आणि अधिवक्ता राजेश गावकर असे उपस्थित होते.



या संकेतस्थळावर सनातन राष्ट्र शंखनाद म होत्सवाविषयी माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सध्या सनातन राष्ट्राचा उद्देश; सनातन राष्ट्राचा शंखनाद करताना भगवान श्रीकृष्णाचे बोधचिन्ह; सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा परिचय; सनातन संस्थेची माहिती; कार्यक्रमाला उपस्थित रहाणारे संत, महंत, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रतिष्ठित व्यक्ती यांची माहिती; सांस्कृतिक कार्यक्रम; लोककला आदींची चित्रे प्रातिनिधिक चित्रे ठेवण्यात आली आहेत. पुढे कार्यक्रमाच्या दृष्टीने वेळोवेळी अधिकची माहिती या संकेस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच सनातन संस्थेच्या वतीने या महोत्सवासाठी धर्मदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## घनसावंगी तालुक्यातील सरपंचपदासाठी आरक्षण सोडत

**जालना** - जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच निवडणूक नियम १९६४ मधील नियम ३ (अ), (ब) व (४) प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन घनसावंगी तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी व महिलांसाठी सन २०२५ ते २०३० या पाच वर्षाकरीता आरक्षित करुन संख्या निश्चित केली आहे. तरी सरपंच पदाचे आरक्षण सोडत घनसावंगी येथील तहसील कार्यालयात मंगळवार दि.२२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता प्रारंभ करण्यात येईल. असे तहसीलदार, घनसावंगी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.